मुंबई विद्यापीठ

प्रोफेसर सुहास पेडणेकर
कुलगुरू

महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई ४०००३२. महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनीः +९१२२ २२६५ ०४०३, २२६५ ६७८९ • फॅक्सः +९१२२ २२६७ ३५७९
ई–मेलः vice-chancellor@mu.ac.in • वेबसाईटः http://www.mu.ac.in

क्र. व्हिसी/ईसीडी/२०२०-२१/६७ | १७ सप्टेंबर, २०२०

प्रति,

सन्माननीय जिल्हाधिकारी,
मुंबई

**विषय: पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा घेणेबाबत...**

महोदय/ महोदया,

सप्रेम नमस्कार.

सध्याच्या कोविड-१९ च्या महामारीच्या काळातही आपण अत्यंत सक्षमतेने आपल्या जिल्ह्याची व जिल्ह्यातील लोकांची संपूर्ण काळजी घेत आहात याकरिता प्रारंभीच मी आपल्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

आपण जाणता आहातच की, जगभरात 'कोविड-१९' महामारीने थैमान घातले असून, काही काळपर्यंत जगभरातील सर्वच व्यवहार ठप्प झाले होते. या ठप्प झालेल्या व्यवहारांमध्ये शिक्षण क्षेत्राचाही समावेश आहे. ही अपवादात्मक परिस्थिती आहे आणि या अपवादात्मक परिस्थितीला आपण सारे सामोरे जात आहोत व त्यावर मात करण्याचा आपल्या सर्वांचा प्रयत्न आहे. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून 'मिशन बिगिन अगेन' च्या अंतर्गत राज्यभरात ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठांतील अध्ययन-अध्यापनाचे कार्य सुरू करण्यात आले आहे.

मुंबई विद्यापीठाच्या वतीने, माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचं नियोजन केले जात आहे. दिनांक २५ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२० या दरम्यान मुंबई विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील सर्व महाविद्यालयांत ऑनलाईन पद्धतीने या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. मुंबई विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील विविध जिल्ह्यांमधील सर्व विद्यार्थ्यांना या परीक्षांना सामोरे जायचे आहे. या अत्यंत नाजूक अशा परिस्थितीत, विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार करून त्यांना सर्व प्रकारच्या सुविधा पुरविणे हे आपले सर्वांचेच कर्तव्य आहे. यावेळचे परिक्षार्थी हे ऑनलाईन पद्धतीने परीक्षा देत असल्यामुळे त्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या म्हणजे - मोबाईल, संगणक, लॅपटॉप या साधनांचा वापर करून ही परीक्षा द्यावयची आहे. ज्या विद्यार्थ्यांकडे या सुविधा उपलब्ध नसतील त्यांना समाजातील परोपकारी घटक मदत करतील याचा विश्वास आहे. परिक्षार्थींनी शक्य तितक्या सुरक्षित वातावरणात, स्वत:च्या घरात बसून, तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ऑनलाईन परीक्षा द्यावी असाच आमचा प्रयत्न आहे, जेणे करून त्यांची सर्वतोपरी काळजी घेतली जाईल. पण ज्या विद्यार्थ्यांना दुर्दैवाने या सुविधा उपलब्ध नसतील त्यांनाही परीक्षेला बसण्याची संधी मिळणं हा त्यांचा हक्क आहे, त्या दृष्टीने केवळ अशाच विद्यार्थ्यांच्या परीक्षा त्यांची महाविद्यालये ओ. एम्. आर्. पद्धतीने घेणार आहेत; म्हणजे या विद्यार्थ्यांना कदाचित प्रत्यक्ष परीक्षा केंद्रांवर जाऊन ही परीक्षा द्यावी लागण्याची शक्यता आहे. आपल्या जिल्ह्याची वैशिष्ट्यपूर्ण अशी भौगोलिक स्थिती, वाहतुकीच्या समस्या, पावसाळ्याचे सरते दिवस ही सर्व परिस्थिती पाहता परीक्षार्थींना जर प्रत्यक्ष केंद्रावर जावेच लागले तर ते परीक्षा केंद्रावर

....२....

मुंबई विद्यापीठ
प्रोफेसर सुहास पेडणेकर
कुलगुरू
महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई ४०००३२. महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनीः +९१२२ २२६५ ०४०३, २२६५ ६७८९ • फॅक्सः +९१२२ २२६७ ३५७९
ई-मेलः vice-chancellor@mu.ac.in • वेबसाईटः http://www.mu.ac.in



वेळेवर पोहोचावेत यासाठी त्यांना सर्व प्रकारचे साहाय्य मिळावे, याकरिता आपण आपल्या हाताखालील सक्षम अधिकाऱ्यांना तत्संबंधी सूचना द्याव्यात, अशी माझी विनंती आहे. या संदर्भात आवश्यकता भासल्यास परीक्षा केंद्र प्रमुख संबंधित सक्षम अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांना त्याविषयी माहिती देतील. या परीक्षा काळात विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करावयाचा असल्यामुळे त्यांना सातत्यपूर्णरित्या व अखंडित वीज पुरवठा व्हायला हवा यासाठी आपण विशेष लक्ष देऊन संबंधितांना तत्संबंधी सूचना द्याव्यात ही विनंती आहे.

आमच्या विनंतीला आपण सकारात्मक प्रतिसाद द्याल व आवश्यक ते सहकार्य कराल याचा मला निश्चितपणे विश्वास आहे.

धन्यवाद!

आपला,

सुहास पेडणेकर
कुलगुरू, मुंबई विद्यापीठ